वितरण आदेश क्रमांक : २
कोषागारातून रोख रक्कम देय अनुदान
सन २०२०-२०२१

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या बंधित अनुदानाच्या (टाईड ग्रँट) दुस-या हप्त्याचे वितरण.

## महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्रक्र-६२/वित्त-४

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख : १५ एप्रिल, २०२१.

<u>वाचा :</u>

१. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.३१/वित्त-४,ग्रा.वि.वि. दि. ९ /३/२०२०.
२. शासन पत्र क्रमांकः जीपीडीपी-२०२०/प्र.क्र.३१/ पंरा-६ ,ग्रा.वि.वि. दि.२८/४ /२०२०
३. शासन पत्र क्रमांकः जीपीडीपी-२०२०/प्र.क्र.३९/ पंरा-६ ,ग्रा.वि.वि. दि.२५/९ /२०२०
४. शासन परिपत्रक क्रमांकः पिईएस-२३२०/प्र.क्र.२२/ आसक,ग्रा.वि.वि. दि.१६/६ /२०२०
५. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ५९ /वित्त-४,ग्रा.वि.वि. दि.२६/६/२०२०.
६. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ५९ /वित्त-४,ग्रा.वि.वि. दि. ४/१२/२०२०.
७. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ६२ /वित्त-४,ग्रा.वि.वि. दि. १०/८/२०२०
८. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.६२ /वित्त-४,ग्रा.वि.वि. दि.२७/०७/२०२०
९. केंद्र शासनाचे वित्त मंत्रालयाचे अनुदान वितरण आदेश क्र.एफ.१५(४)एफसी-एक्सव्ही/एफसीडी/२०२०-२५ दि.२६.३.२०२१ चे पत्र : RLB Release No.२४/२०२१

<u>प्रस्तावना :</u>

पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्यासाठी सन २०२०-२१ च्या बंधित अनुदानाच्या (टाईड ग्रँट) दुस-या हप्त्यापोटी रू. १४५६.७५ कोटी इतका निधी मुक्त केला असल्याचे केंद्र शासनाच्या उपरोक्त संदर्भ क्र. ९ येथील दि.२६.३.२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाकडून

राज्य शासनास प्राप्त झालेला निधी राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना (जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरांवर) वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाचा सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा बंधित अनुदानाच्या (टाईड ग्रँट) दुस-या हप्त्याचा केंद्रशासनाकडून मुक्त करण्यात आलेला रू. १४५६.७५ कोटी इतका निधी सोबतच्या विवरणपत्रात (प्रपत्र-अ) दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण स्थनिक स्वराज्य संस्थाना (जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरांसाठी ) अनुक्रमे (२५१५२६३७ /२५१५२६५५ /२५१५२६७३ ) या लेखाशीर्षाखाली वितरीत करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विवरणपत्रानुसार (प्रपत्र-अ) निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे ( Budget Estimation Allocation & Monitoring System/ बीम्सवर ) वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी सर्व पंचायत राज संस्थांना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांमध्ये अनुक्रमे १०:१०:८० या प्रमाणात वितरीत करण्यात येत आहे.

२. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील बंधित अनुदानाच्या (टाईड ग्रँट) दुस-या हप्त्यापोटी प्राप्त रू. १४५६.७५ कोटी इतका निधी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींना वितरीत करावयाचा आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे आहरण व संवितरण अधिकारी असल्यामुळे सदर योजनेंतर्गत शासनाकडून प्राप्त होणारा निधी कोषागारातून आहरित करून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे वर्ग करतात. या कार्यपध्दतीमुळे कालापव्यय होतो. यास्तव १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत शासनाकडून प्राप्त होणारा निधी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना १०:१०:८० या प्रमाणात वितरित करण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. त्यांचे नियंत्रक अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी राहतील. मुख्य लेखा व वित्त अधिकारी १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील बंधित अनुदानाच्या दुस-या हप्त्यापोटी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीची देयके कोषागारात सादर करतील. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेकरिता २५१५२६३७ या लेखाशिर्षांतर्गत १०% च्या प्रमाणात वितरित करण्यात आलेला निधी जिल्हा परिषदेच्या १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यावर वर्ग करावा. तसेच २५१५२६५५ या लेखाशिर्षांतर्गत १०% च्या प्रमाणात वितरीत करण्यात आलेला निधी संबंधित

जिल्हा परिषदेच्या अधिनस्त सर्व पंचायत समितींना आणि २५१५२६७३ या लेखाशिर्षांतर्गत ८०% च्या प्रमाणात वितरीत करण्यात आलेला निधी संबंधित जिल्हा परिषदेच्या अधिनस्त सर्व ग्रामपंचायतींना वितरीत करावा. यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) संबंधित जिल्हा परिषदेतील सर्व पंचायत समिती आणि ग्राम पंचायतींची यादी १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्याच्या तपशीलासह (बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक व IFSC कोड) मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना उपलब्ध करून देतील. त्यानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सर्व पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीनी १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यावर इ.सी.एस. (Electronic Clearance System)/एन.इ.एफ.टी (National Electronic Fund Transfer) किंवा आर.टी.जी.एस (Real Time Gross Settlement) या आधुनिक बँकिंग सिस्टीमद्वारे विहित केलेल्या निधी वाटपाच्या निकषांच्या आधारे तातडीने निधी वर्ग करतील. विहित निकषांनुसार सर्व पंचायत समिती व ग्रामपंचायतींना निधी वितरीत करून त्याबाबतचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीचे या शासन निर्णयासोबत जोडलेल्या “प्रपत्र - ब” नुसार प्रमाणपत्र शासनास तातडीने सादर करावे.

३. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी, पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाचा निधी यापूर्वी शासनाने दिलेल्या सूचनांनुसार पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीच्या व्यवहारासाठी उघडलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेच्या स्वतंत्र बचत खात्यातच ( Savings Bank Account ) ठेवावा.

४. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, सनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांची राहील.

५. पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या सन २०२०-२१ या पहिल्या आर्थिक वर्षाच्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानातून घ्यावयाची कामे, त्याचे नियोजन, समन्वय व नियंत्रण याबाबतच्या मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र. ५ ,६ व ७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासूनच्या पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या वितरीत निधीतून पंचायत राज संस्थांनी ग्रामपंचायत विकास आराखडयानुसार कामे व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावयाची असून यासंदर्भातील सूचना ग्राम विकास विभागाकडून संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

६. वरील प्रक्रियेमध्ये संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील गावांतील सद्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करून गावाच्या गरजांची निश्चिती करून कामे ठरविण्याचे अधिकार ग्रामसभा व ग्रामपंचायतीला आहेत.

७. पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार बंधित अनुदानाचा वापर पुढील पायाभूत सेवांसाठी करावयाचा आहे :-

१. स्वच्छता आणि हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती कायम राखणे तसेच देखभाल व दुरूस्ती .

२. पेयजल पाणीपुरवठा, जल पुनर्भरण / पावसाच्या पाण्याची साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिग), जल पुन:प्रक्रिया (वॉटर रिसायकलींग). बंधित अनुदानाचा वापर हा वरील नमूद दोन बाबींसाठी प्रत्येकी ५०% च्या प्रमाणात करावयाचा आहे. जर वरील दोन बाबींपैकी एकाची पूर्णत: अंमलबजावणी झाली असेल तर त्यासाठीचा निधी दुस-या बाबीसाठी खर्च करण्यात यावा.

८. ग्रामपंचायतींनी पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या निधीसाठी राष्ट्रीयीकृत बँकेत उघडलेल्या स्वतंत्र खात्यातील रकमेतून करावयाचे व्यवहार संदर्भ क्र. ४ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनूसार करावेत.

९. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करू नये व जास्तीचे आर्थिक दायित्व निर्माण करू नये.

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरांसाठी १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या बंधित अनुदानाच्या दुस-या हप्त्यापोटी महाराष्ट्र राज्यास प्राप्त निधीच्या वितरणासाठी होणारा खर्च, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या खालील लेखाशिर्षांखाली उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकावा.

१. मागणी क्रमांक-एल-३,२५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, (००),१९६ - जिल्हा परिषदांना /जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य (००) (००) (१०) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदांना/जिल्हास्तरीय पंचायतींना विविध विकास योजनांसाठी सहाय्य अनुदाने. (बंधित अनुदान/ टाईड ग्रँट) (२५१५२६३७) ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (रू.१४५.६७५० कोटी)

२. मागणी क्रमांक-एल-३, २५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम,(००),१९७ - पंचायत समितीना सहाय्य,(००), (००) (०३)१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत समितींना

सहाय्य अनुदाने (बंधित अनुदान/ टाईड ग्रँट) ( २५१५ २६५५ ),३१- सहाय्यक अनुदाने ( वेतनेतर) (रू.१४५.६७५० कोटी)

३. मागणी क्रमांक-एल-३,२५१५ - इतर ग्रामीण विकास कार्यक्रम,(००),१९८-ग्रामपंचायतींना सहाय्य (००),(००) (११) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना सहाय्य अनुदाने. (बंधित अनुदान/ टाईड ग्रँट ) (२५१५ २६७३), ३१- सहाय्यक अनुदाने ( वेतनेतर) (रू.११६५.४० कोटी)

११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या शासन निर्णयाच्या प्रती त्यांचे अधिनस्त सर्व जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

११. वरील परिच्छेद ११ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निधी वितरित करण्यास मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांच्या मान्यतेने सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२/२०२१ वित्त आयोग कक्ष, दिनांक १२/०४/२०२१ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र.२०२१०३३०१६२७५६७७२० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shashank Yashwant Barve

Digitally signed by Shashank Yashwant Barve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4f19736b62993d2c7e716a76cdcfdaa8a6a08fc2f15bfd41fed42ec7306bf1e8, cn=Shashank Yashwant Barve
Date: 2021.04.15 16:40:12 +05'30'

**(शशांक य. बर्वे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत.
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.विरोधी पक्षनेते, विधानसभ / विधान परिषद
मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक. मंत्रालय, मुंबई.
मा.अ.मु.स. (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक, बांधकाम भवन, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व उपसचिव / अवर सचिव, ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन, मुंबई
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७ / वित्त आयोग कक्ष.) मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग ( सर्व कार्यासने ), बांधकाम भवन, मुंबई
निवड नस्ती का.क्र.वित्त-४, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई

प्रपत्र- अ

बंधित अनुदान/ टाईड ग्रँट

वितरण आदेश क्र. २ क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.६२ / वित्त-४, दिनांक १५/०४/२०२१ चे विवरणपत्र

(रू.हजारात)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद (लेखाशिर्ष-२५१५२६३७) | पंचायत समिती (लेखाशिर्ष-२५१५२६५५) | ग्रामपंचायत (लेखाशिर्ष-२५१५२६७३) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ठाणे | २२२२९ | २२२२९ | १७७८२९ | **२२२२८७** |
| २ | पालघर | ३६२२३ | ३६२२३ | २८९७८६ | **३६२२३२** |
| ३ | रायगड | ३८८१६ | ३८८१६ | ३१०५२६ | **३८८१५८** |
| ४ | रत्नागिरी | ३२७२६ | ३२७२६ | २६१८११ | **३२७२६३** |
| ५ | सिंधुदूर्ग | १८३२४ | १८३२४ | १४६५९२ | **१८३२४०** |
| ६ | नाशिक | ८२०४४ | ८२०४४ | ६५६३४९ | **८२०४३७** |
| ७ | धुळे | ३४९६७ | ३४९६७ | २७९७३६ | **३४९६७०** |
| ८ | नंदूरबार | ३२१०२ | ३२१०२ | २५६८१८ | **३२१०२२** |
| ९ | जळगाव | ६७१२० | ६७१२० | ५३६९५६ | **६७११९६** |
| १० | अहमदनगर | ८५३९७ | ८५३९७ | ६८३१७३ | **८५३९६७** |
| ११ | पुणे | ८५५१७ | ८५५१७ | ६८४१३३ | **८५५१६७** |
| १२ | सातारा | ५६७०४ | ५६७०४ | ४५३६३५ | **५६७०४३** |
| १३ | सांगली | ४८७६६ | ४८७६६ | ३९०१३० | **४८७६६२** |
| १४ | सोलापूर | ६९२३३ | ६९२३३ | ५५३८६१ | **६९२३२७** |
| १५ | कोल्हापूर | ५९९७४ | ५९९७४ | ४७९७९० | **५९९७३८** |
| १६ | औरंगाबाद | ४९११५ | ४९११५ | ३९२९१६ | **४९११४६** |
| १७ | जालना | ३७३७८ | ३७३७८ | २९९०२८ | **३७३७८४** |
| १८ | परभणी | २९९२९ | २९९२९ | २३९४३५ | **२९९२९३** |
| १९ | हिंगोली | २३५८७ | २३५८७ | १८८६९९ | **२३५८७३** |
| २० | बीड | ४९२७१ | ४९२७१ | ३९४१७० | **४९२७१२** |

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद (लेखाशिर्ष-२५१५२६३७) | पंचायत समिती (लेखाशिर्ष-२५१५२६५५) | ग्रामपंचायत (लेखाशिर्ष-२५१५२६७३) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २१ | नांदेड | ५७१३६ | ५७१३६ | ४५७०९१ | **५७१३६३** |
| २२ | उस्मानाबाद | ३२९६७ | ३२९६७ | २६३७३२ | **३२९६६६** |
| २३ | लातूर | ४२३९९ | ४२३९९ | ३३९१९० | **४२३९८८** |
| २४ | बुलढाणा | ४८०२८ | ४८०२८ | ३८४२२६ | **४८०२८२** |
| २५ | अकोला | २६०२६ | २६०२६ | २०८२०८ | **२६०२६०** |
| २६ | वाशिम | २३३३२ | २३३३२ | १८६६५६ | **२३३३२०** |
| २७ | अमरावती | ४५२५५ | ४५२५५ | ३६२०४० | **४५२५५०** |
| २८ | यवतमाळ | ५२८५७ | ५२८५७ | ४२२८५७ | **५२८५७१** |
| २९ | वर्धा | २१७२७ | २१७२७ | १७३८१७ | **२१७२७१** |
| ३० | नागपूर | ३६०११ | ३६०११ | २८८०८५ | **३६०१०७** |
| ३१ | भंडारा | २२५३८ | २२५३८ | १८०३०८ | **२२५३८४** |
| ३२ | गोंदिया | २५८७८ | २५८७८ | २०७०२४ | **२५८७८०** |
| ३३ | चंद्रपूर | ३५८७३ | ३५८७३ | २८६९८३ | **३५८७२९** |
| ३४ | गडचिरोली | २७३०१ | २७३०१ | २१८४१० | **२७३०१२** |
| | एकूण | **१४५६७५०** | **१४५६७५०** | **११६५४०००** | **१४५६७५००** |

Shashank Yashwant Barve

Digitally signed by Shashank Yashwant Barve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4f19736b62993d2c7e716a76cdcfdaa8a6a08fc2f15bfd41fed42ec7306bf1e8, cn=Shashank Yashwant Barve
Date: 2021.04.15 16:41:57 +05'30'

(शशांक य. बर्वे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रपत्र-ब**

प्रमाणित करण्यात येते की, १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत सन -----------या वर्षाचा बंधित अनुदान/ टाईड ग्रँट, शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.----------------, दि.-------- अन्वये जिल्हा परिषदेला प्राप्त झालेल्या निधीपैकी शासनाने निश्चित केलेल्या १०:१०:८० च्या प्रमाणात जिल्हा परिषद आणि अधिनस्त सर्व पंचायत समिती ( -------पंचायत समितींची संख्या ) व ग्रामपंचायतीना (------ग्रामपंचायतींची संख्या) शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच विहित केलेल्या निकषांनुसार इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे.

**सही:**
**नाव:**
**दिनांक:**
**(मुख्य लेखा व वित्त अधिकारी)**
**जिल्हा परिषद ---------**

**सही:**
**नाव:**
**दिनांक:**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी)**
**जिल्हा परिषद ---------**